Impact Factor 4.574

ISSN 2349-638x

Peer Reviewed And Indexed

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Journal

VOL-V ISSUE-VIII Aug. 2018

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# मराठी एकांकिकाचे स्वरूप

**डॉ. वासंती ज्ञानेश्वर पांढरे**
मराठी विभाग,
एम.जी.डी. बी.एड् कॉलेज सोलापूर.


**प्रास्ताविक**

मराठीत विविध साहित्य प्रकाराला लोक परंपरेचा प्राचीन वारसा आहे. साहित्य आणि सामाजिक दृष्टी यामध्ये साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध दिसून येतो. साहित्यात समाज जीवनाच्या वर्तमान स्थितीचे प्रतिबिंब पडलेले असते. कोणतीही साहित्यकृती ही त्या परिस्थितीचे, काळाचे अपत्य असते कालमानानुसार समाज जीवनामध्ये ज्याप्रमाणे बदल घडत जात असतो त्याचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते.

एकूणच मानवी जीवनाला सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि धार्मिक असे अनेकविविध संदर्भ असतात साहित्य हे मानवी जीवनातून उदयाला येते असल्यामुळे त्यामध्ये संदर्भ कमी अधिक प्रमाणात येणे अटळ असते. साहित्याच्या स्वरूपामध्ये होणारा बदल हा समाजामध्ये होत असणाऱ्या बदल्यामुळेच होत असतो. त्यामुळे साहित्य– निर्मिती आणि साहित्य विकास हा समाजसापेक्ष असतो.

'एकांकिका' हा साहित्य प्रकार नाटयवाङ:मयात मोडतो. भारतीय नाटय परंपरेवर संस्कृतचा प्रभाव असलेला दिसतो. नाटक या वाङ:मय प्रकाराला परंपरेचा प्राचीन वारसा आहे.

नाटयवाङ:मयात विविध प्रकार दिसून येतात. त्यामध्ये.




**एकांकिका**

एकांकिका म्हणजे एक अंकी नाटक. स्थलकालाच्या मर्यादित अवकाशात आपल्या सर्व नाटयशक्ती एककेंद्रिंत करणारा थोडक्यात उत्कट एकसंघ व एकजिनसी परिणाम साधणारा संपूर्ण, स्वयंपूर्ण एक अंकी नाटय प्रकार म्हणजे एकांकिका. भरताने संस्कृत नाटयशास्त्रात नाटकांचे दहा प्रकार सांगितले आहेत. त्यातले, गाण, उत्सृष्टिकांक, त्यायोग आणि वीथी हे चार प्रकार एकांकिकांचे आहेत. याचा अर्थ भरताच्या काळातही ही चार प्रकारची नाटके असावीत. स्थल, काल व

कथानकाची एकता साधणाऱ्या प्रभावी व्यक्तिरेखा असणाऱ्या व एकसंघ स्वरूपाच्या पाच स्वयंपूर्ण एकांकिका भास या नाटककारांनी लिहिल्या आहेत. पण भासला अनुसरून नंतरच्या नाटककारांनी अशा एकांकिका लिहून एक प्रवाही पंरपरा निर्माण केल्याचे आढळत नाही. त्यानंतर भारतामधल्या ब्रिटीश राजवटीच्या काळात मुख्यत्वे संस्कृत आणि इंग्रजी वाङ:मयावरून स्फूती घेऊन मराठी एकांकिका लिहिल्या गेल्या. भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या काळात माहा हा नाटयप्रकार मराठीत भरभराटी आला.

एकांकिका सुमारे अध्या ते पाऊण तासाची असते ती बहरूपिणी असते. तिला कोणत्याही विषयाचे वावडे नसल्याने ती काव्यमय, चर्चात्मक, प्रहसनासारखी, तत्वचिंतनपर किंवा रहस्यकथेसारखी असू शकते. एखाद दुसरीच मध्यवर्ती व्यक्तिरेखा, अर्थभारित आणि नाटयगर्भ असे मोजके संवाद, तीव्र व उत्कट परिमिणाम साधणारे प्रसंग या सर्वाच्या साहयाने एकांकिका एकात्म परिणाम साधते आजची मराठी एकांकिका ही एकप्रवेशी न राहता बहुप्रवेशी आणि बहूकेंद्री झाली आहे.

मराठीतील सुरूवातीच्या एकांकिका या इंग्रजी एकांकिकांचे अनुवाद आणि रूपांतरे असत. उदा:— इंग्रजी 'द सीक्रेट' चा किरातांनी केलो 'संशयी शिपाई' हा अनुवाद 'दि डिअर डिपार्टेड' आणि 'कमिंग क्षू द राय' या एकांकिकांची माधव मनोहर यांनी अनुक्रमे 'आजोबांच्या मुली आणि जन्मापूर्वी' ही रूपांतरे पुढील काळात अनंत काणेकर दत्तू बांदकेर, भा.वि वरेरकर, मो. ग. रांगणेकर, व्यंकटेश वकील, शं.बा. शास्त्री इ. लेखकांच्या एकांकिका ही प्रकाशित झाल्या.

इ.स १९५० मध्ये मुंबईतील भारतीय विदया भवन या संस्थेने आंतरमहाविदयालयीन एकांकिका स्पर्धा दयावयास सुरूवात केली. आणि मराठीत एकांकिका हा नाटयप्रकार बहरास आला.

रंगभूमी लवचिक होणाऱ्या प्रक्रियेत नाटयवाङ:मयातील एकांकिका लेखनाचा उल्लेख करावा लागतो. मराठी नाटकांपेक्षा एकांकिका अधिक गहन अनुभव अविष्कृत करतात.हे १८०० ते १९८० या कालखंडातील काही प्रातिनिधीक एकांकिका सिध्द केले. नाटकाविषयीच्या नव्या जाणिवा नाटकापेक्षा आधिक राहनपणे एकांकिका लेखनात व्यक्त झाल्या आहेत.

१८०० ते १९८० या कालखंडात एकांकिका विपुल संग्रह या आणि पुढल्या काळात प्रकाशित झाले. एकांकिका(१९५७), श्री जयवंत दळवी यांच्या कावळे आणि इतर एकांकिका (१९६०), शं.ना. नवरे यांचा 'चार एकांकिका'(१९६१), एकाच मातीची खेळणी, (१९६२) पदमाकर डावऱ्यांच्या विनोदी एकांकिका श्री. गंगाधर गाडगीळ यांच्या बंदू हे पात्र केंद्रस्थानी कल्पून लिहिलेल्या एकांकिका या विविध एकांकिकांनी मराठी रंगमंचाकडे ज्या वेगवेगळया मागण्या केल्या त्यातून विकास घडलेला आहे पाश्चात्य एकांकिकांच्या रूपांतराच्या रूपाने अनंत काणेकर आणि माधव मनोहर यांनी नव्या अभिरूचीवर संस्कार करण्याचे प्रयत्न केले होते. तसेच बा.सी. मर्देकरांच्या 'नटश्रेष्ठ आणि चार संगीतिका' या संग्रहाचा उल्लेख करावयास हवा या कालखंडातील महेश एलकुंचवारांच्या 'सुलतान' या संग्रहातील 'होळी' ही एकांकिका समूहाचा अनुभव तरूण मनातील गुदमर आणि स्फोट प्रत्ययकारीपणे रंगविणारी म्हणून उल्लेखनीय ठरली. १९५५ ते १९६६ या पहिल्या दशकातील एकांकिकांचा विचार करता रंगपीठ आणि प्रेक्षक यातील नव्या नात्याचा शोध, रंगमंच, भाषा इ. नाटककारांनेच आत्मसात करण्याचा केलेला प्रयत्न, मानवी मिश्रवृत्तीचे बदलते रंग टिपण्याचा प्रयत्न, एकांकिका हा एकसंध, एकरसात्मक अनुभव म्हणून त्याकडे पाहण्याचा प्रयत्न ठळकपणे लक्षात येतो.

शिरवाडकर, कानेटकर, जयवंत दळवी यांच्या बरोबरीने गंगाधर गाडगीळ, पु.ल.देशपांडे हया नाटकारांनी एकांकिका लेखन केले. यातील पु.ल आणि गाडगीळ यांच्या विनोदाचा बान मराठी एकांकिका लेखनात एक चांगला परिणाम देणारा ठरला. या कालखंडामध्ये एकांकिका लेखनाने महत्वाचे स्थान मिळविले. नाटकाविषयीच्या नव्या गहन व गंभीर जाणिवा नाटकांपेक्षा एकांकिकामधून अधिक गंभीरपणे व्यक्त झाल्या.

**संदर्भ**

१) एकांकिका विकीपीडीया.
२) मराठी वाङ:मयाचा इतिहास अभ्यासपत्रिका.